● मंगळवार, दि १० सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ... तर याच शैक्षणिक वर्षापासून सुरु होईल मेडिकल कॉलेज - आ. गोरंटयाल



**जालना | प्रतिनिधी -** जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांची पदे तातडीने भरावीत यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहे. शासनाने सदर पदे भरल्यास याच शैक्षणिक वर्षापासून सदर कॉलेज सुरू होईल असा विश्वास आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजुरी पासून त्यासाठी जागा निश्चिती आणि अन्य सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी आ. कैलास गोरंटयाल यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून विधिमंडळाच्या पावसाळी, हिवाळी व अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील या प्रश्नावरून सभागृहात टोकाचा संघर्ष करत जालन्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजुरीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. राज्य सरकारने त्यांच्या या संघर्षाची दखल घेत जालन्यातील मंजूर करण्यात आलेल्या या महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासह वसतिगृह आणि अन्य बाबींसाठी तब्बल ४०४ कोटी रुपयांचा निधी देखील मागील काही महिन्यांपूर्वी मंजूर करून त्याची तरतूद केली आहे. मात्र, पद भरतीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे जालन्यासह राज्यातील ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना पदभरती करण्यासाठी केंद्रीय आरोग्य पथकाकडून दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. दि. २४ जून २०२४ रोजी दिल्ली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक जालना येथे आले होते. या पथकाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आलेली जागा व अन्य बाबींची तपासणी करून त्यात काही त्रुटी काढल्या होत्या. मात्र सदर त्रुटींची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल मेडिकल कौन्सिलकडे पाठविण्यात आला असल्याचे सांगून आ.गोरंटयाल म्हणाले की, दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी व्हीसीद्वारे झालेल्या सुनावणीच्या वेळी जुलै ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्या अधिकारात स्थानिक पातळीवर ११ सहाय्यक प्राध्यापक आणि १४ वरिष्ठ निवासी पदे भरण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, उर्वरित पदांची भरती न झाल्यामुळे प्रथम अपील अमान्य करण्यात आले होते. याप्रकरणी दुसरे अपील केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण या मंत्रालयाकडे दाखल करण्यात आले असून त्यावर **पान ३ वर**

### इमारत बांधकाम निविदा प्रसिद्ध

जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इमारत बांधकाम करण्यासाठीची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून दि. २ ते १० सप्टेंबर २०२४ या कालावधीत इच्छुक एजन्सीकडून निविदा मागविण्यात आल्या असल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले. ऑक्टोबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नव्याने मंजूर करण्यात आलेल्या मेडिकल कॉलेजच्या इमारत बांधकामाचा शुभारंभ करण्यात येईल अशी शक्यता व्यक्त करून जालन्यातील मेडिकल कॉलेजच्या इमारत बांधकामाचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होईल अशी माहिती देखील त्यांनी दिली आहे.

# जोडरस्त्यासाठी शेतकऱ्यांचे महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

## दिड तास महामार्गावरील वाहतूक खोळंबली



**आष्टी | प्रतिनिधी -** शेगाव - पंढरपूर महामार्गावरील भगवान बाबा नगर, दत्त नगर, पळशी व आनंदगाव सह शेतकऱ्यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सना - सुगीच्या काळात झालेल्या या आंदोलनामुळे दिड तास महामार्गावर वाहतूक खोळंबली होती.म रा रस्ते विकास महामंडळाकडून एका महिन्याच्या मुदतीत करुन घेण्याची जबाबदारी आष्टी ठाण्याचे सपोनी सचिन इंगेवाड यांनी दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन एका महिन्यासाठी स्थगित करण्यात आले.

आष्टी पासून माजलगाव कडे जाणाऱ्या शेगाव - पंढरपूर महामार्गाला भगवान बाबा नगर, दत्त नगर, पळशी व आनंदगाव येणाऱ्या रस्त्यालां जोडला (जांगाशन) नसल्याने या गावांच्या शेतकऱ्यांना उलट्या दिशेने जावें लागते या प्रकारामुळे अनेक अपघात झाले आहेत. पुढील मोठी दुर्घटना टाळण्यासाठी महामार्गाच्या मधोमध असलेले डिव्हायडर तोडून त्या ठिकाणी जगशेन करणे आवश्यक आहे. या बाबत प्रशासनातील जिल्हा अधिकारी व संबंधित दिंडी महामार्गाचे अधिकाऱ्यांना दिनांक ७ जुलै २०२४ रोजी कळविले होते. परंतू प्रशासन व जालना रस्ते विकास महामंडळाचे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याने वरिल गावकऱ्यांच्या वतीने **पान ३ वर**

# गोदावरी नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्कता बाळगावी - जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ



**जालना | प्रतिनिधी -** जायकवाडी प्रकल्प अर्थात नाथसागर जलाशय ९७.३० टक्के क्षमतेने सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजता भरला आहे. तसेच पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसाच्या पाण्याची आवक व उर्ध्व भागातील धरणांमधुन येणारी आवक बघता आज दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी ठिक १२ ते १ वाजेदरम्यान जायकवाडी धरणाच्या सांडव्याद्वारे गोदावरी नदी पात्रात ३१४४ क्युसेक विसर्ग सुरू करण्यात येणार आहे. पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढविणे, कमी करणेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल. तरी नदी काठच्या गावांतील नागरिकांनी सावध राहावे. कुणीही गोदावरी नदीपात्रात प्रवेश करू नये व कुठलीही जिवीत व वित्त हानी होऊ नये, यासाठी गोदावरी नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. नदीकाठच्या **पान ३ वर**

# शासकीय योजनांची माहिती पोहचविण्यासाठी योजनादूतांची नेमणूक

## ऑनलाईन अर्ज करण्याचे शासनाने आवाहन; दहा हजार रुपये मिळणार मानधन

**जालना | प्रतिनिधी -** शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या अंतर्गत जिल्ह्यात प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एक तर शहरी भागात पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा एकूण १ हजार २१९ योजनादुतांची निवड होणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्राम पंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार **पान ३ वर**

## युवा आदर्श

### शो बाजी ...

वरुन निघाले फतवे
जन संपर्क वाढवा
भुरळ पाडा चांगली
शक्कल छान लढवा
काम असू द्या साधे
सजावटीतून मढवा
नेत्र दिपक रोषणाई
आतषबाज्या उडवा
स्तुतीपाठ करे गावे
सर्व चमच्यांना पढवा
लफडे बाहेर काढती
असंतुष्टा वेळी अडवा
लोकां नको वाटते जे
विरोध करावा कडवा
घमघमाट सुटो सर्वत्र
तूप झक्कास कढवा
बाहेर पडतीलं रहस्ये
योग्य ठिकाणी दडवा
जो कोणी पडे अडवा
नाजूक जागेत नडवा
जिथे खात्री विजयाची
तिथलीचं सीट लढवा
कुटुंबातील सदस्याचे
राजकीय भाग्य घडवा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# नुकसान भरपाईच्या मागणीसाठी फळबागायतदारांची महारॅली




**जालना | प्रतिनिधी -** वातावरण बदलामुळे मोसंबीची फळगळ होऊन प्रचंड नुकसान झाले असून शासनाने मदत करावी, या मागणीसाठी जालन्यात आज फळबागायतदार शेतकऱ्यांनी महारॅली काढलीय. आज दिनांक ९ सोमवार रोजी १२:३० वाजेच्या सुमारास जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथून रॅलीला सुरुवात झाली शनी मंदिर, गांधी चमन, मस्तगड, पाणीवेस मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतला पर्यंत ही रॅली काढण्यात आलीय. वर्ष २०१८ व २०२२ मध्ये मंजूर झालेला फळ पीक विमा वाटप करावा, वर्ष २०१८ ते २०२३ पर्यंतच्या फळ पीक विम्याचे सरकारी देयक शेतकऱ्यांना द्यावे यासह फळगळ नुकसान **पान ३ वर**

# जिल्हा परिषद शाळेमध्ये मुलींच्या सुरक्षीततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवा

## अन्यथा शिवसेनेच्या वतीने आंदोलन; सिओंना निवेदन

**भोकरदन | प्रतिनिधी -** तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळेत मुलींच्याा सुरक्षितेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावी, या मागणीचे निवेदन सोमवार (दि ९) रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भोकरदन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांच्यासह पदाधिकार्यांनी दिली.




सिओंना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाबाबत अगोदरच पालकांची उदासिनता त्या नंतर शाळेमध्ये मुलींसाठी विधायक सोईसुविधांचा अभाव, समाज मनावर जुण्या रुढी परंपराचे प्राबल्य अशा परिस्थीतीत बदलापुर सारख्या असंख्य घडणार्या घटना यामुळे **पान ३ वर**

# बाजारपेठेत पोलीसांनी दिड लाखांचा गुटखा पकडला

## कारसह आठ लाखाचा मुद्देमाल जप्त; अद्याप भोकरदन नाका परिसरातील गुटखा किंगचा बाजार सुरुच...

**जालना | प्रतिनिधी** - शहरातील मुख्य बाजारपेठ परिसरात रविवार (दि ८) मध्यरात्री पोलीसांनी सुमारे दिड लाख रू. किंमतीचा गुटखा व एका कारसह आठ लाख रुपयांचा मुद्देमाज जप्त केला आहे. ही कारवाई सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पथकाने केली आहे. या कारवाईने पोलीसांचे कौतुक होत असले तरी सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या भोकरदन नाका पोलीस चौकीच्या नाकावर टिच्चून एक गुटखा किंग आपली सुत्रे याच परिसरातून हलवत आहे. या परिसरातील



अनेक पान टपऱ्यांवर बेदिक्कत गुटखा विक्री सुरु आहे. असे असले तरी याचा थांगपत्ता या पोलीसांना नसावा का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. याच अनुषंगाने युवा आदर्शने मागील आठवड्यात 'गुटखा बंदीची जिल्ह्यात नौटंकी; विक्री जोमात' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. त्यानंतर सदर बाजार पोलीसांनी केलेल्या कारवाईमुळे जिल्ह्यात गुटखा विक्री सुरु असल्याचे स्पष्ट होत आहे. पोलीसांनी भोकरदन नाका परिसरात सुरु असलेल्या त्या गुटखा किंगचा बाजार उद्धवस्त केल्यास जिल्ह्यात बऱ्यापैकी गुटखा विक्रीला आळा बसण्याची शक्यता आहे.

रविवार (दि ८) रात्री एका महागड्या कारमध्ये अवैध मार्गाने शहरात गुटखा येणार असल्याची गुप्त माहिती सदर बाजार पोलीसांना मिळाली होती. त्यावरून पोलीसांनी सापळा रचून कारवर कारवाई केली असता, त्यामध्ये विविध प्रकारचा गुटखा आणि सुगंधित तंबाखू असल्याचे निष्पन्न झाले. कार क्रं. MH 21 BV 3213 सह पोलीसांनी आठ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी अन्न व औषधी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून सोमवार (दि.९) रोजी दुपारी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संदिप भारती यांच्या पथकाने केली आहे.


युवा आदर्श
https://yuvaadarsh.com

गुटखा बंदीची जिल्ह्यात नौटंकी; विक्री जोमात

# संपादकीय

## हा पैशांचा माज का?

जालना लोकसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित खासदार डॉ. कल्याण काळे यांनी पत्रकारांना त्यांचे स्वीय सहाय्यक अथवा हितचिंतक श्री कुलकर्णी यांनी फोन करुन खा. डॉ. काळे यांनी पत्रकारांशी हितगुज करण्यासाठी शहरातील एका हॉटेलमध्ये सोमवार (दि ९) रोजी दुपारी १२ वाजता गेट टुगेदर ठेवल्याचे निमंत्रण दिले. या निमंत्रणाचा स्विकार करत शहरातील अनेक पत्रकार वेळेवर ठरविलेल्या ठिकाणी पोहचले खरे. मात्र, त्या ठिकाणी खा. काळे यांचे कोणतेही प्रतिनिधी उपस्थित होते किंवा कसे हेच तासभरापेक्षा अधिकचा वेळ होऊपर्यंत उमगलेच नाही. खा. डॉ. काळे यांना येण्यास उशिर होत असल्याने पत्रकारांनी कार्यक्रमावर बहिष्कार टाकून हॉटेल सोडण्याचा निर्णय घेतला. हे समजताच श्री कुलकर्णी यांनी पत्रकारांना समजावण्याचा प्रयत्न केला. आधी जेवण करा तोपर्यंत खासदार काळे येतील असे सांगण्याचा ते वारंवार पर्यंत करत होते. पत्रकार काय जेवणावर बसले काय? वेळ दिल्यानंतर वेळ पाळता येत नाही. आणि त्यांवर पांघरुन घालायला आधी जेवन करुन घ्याची त्यांनी टिमकी मिरविली. त्यामुळे काही उपस्थित पत्रकारांचा पारा अधिकच चढला. त्यामुळे अनेक पत्रकारांनी हॉटेल सोडले. मात्र, खासदार काळे यांच्या जीवाभावाचे अथवा लोकसभेत पॅकेज मिळालेले किंवा विधानसभेत पॅकेजची अपेक्षा असलेले त्याही पेक्षा घरुन भोजनाच्या अपेक्षेने आलेले अनेक पत्रकार डॉ. काळे यांची प्रतिक्षा करत बसले. मुळात प्रतिक्षेत असलेल्या पत्रकारांमध्ये अनेक पत्रकारांकडे आरएनआयचे टायटल नाही. काहींकडे टायटल आहे तर आरएनआयचे सर्टीफिकेट नाही. काहीतर युट्युब चॅनल असलेले स्वयंघोषित पत्रकार होते. काही अपवाद सोडता अनेक बोगस पत्रकार थांबल्याने पत्रकारांची संख्या उशिराने पोहचलेल्या डॉ. काळे यांना दिसून येत होती. त्यामुळे बहिष्कार टाकून हॉटेल सोडणाऱ्या पत्रकारांचे त्यांना मोल राहिले नसावे. असो, हा त्यांचा प्रश्न मात्र, पत्रकारांना हाताशी धरून डॉ. काळे यांनी पत्रकार-पत्रकारांमध्ये ठीणगी पेटवण्याचे काम करणार असल्याचे सुतोवाच दिले आहे. लोकसभा निवडणुकीतही त्यांनी याच प्रकारे एका पत्रकारास जाहिराती वाटपाचा ठेका दिला होता. त्यांनेही नंतर मनमानी पद्धतीने जाहिरातीचे वाटप केले. याबाबतही अनेक पत्रकारांनी आवाज उठवला होता. मात्र, खा. डॉ. काळे यांच्या कानापर्यंत तो आवाज कदाचित पोहचू शकला नसावा. खा. डॉ. काळे यांच्या आजच्या हितगुजचा विषय कदाचित कोणाकडुन कसे काम करुन घ्यायचे आणि कोणाला किती वेळ ताटकळत ठेवायचे? जाहीरातीसाठी कोण किती वेळ ताटकळतो, भोजनासाठी कोण-किती वेळ वाट पाहतो. याची चाचपणी तर नव्हती ना असा प्रश्न उपस्थित होतो. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी लोकसभा निवडणुकी दरम्यान त्यांच्यावर झालेल्या एका आरोपाला उत्तर देतांना 'मी, खानदानी श्रीमंत असून मला कोणीही विकत घेऊ शकत नाही' असे वक्तव्य केले होते. कदाचित याच पैशाचा माज त्यांना असेल का? अशी शंका यानिमित्ताने उपस्थित होते आहे. स्वाभीमानी पत्रकारांनी तसेच चाटुगिरी न करणाऱ्या व अधिकृत पत्रकारांनी या सर्व लोभापासून दूर असल्याचे हॉटेल सोडून दाखवून दिले आहे. हे मात्र खरे.

## पॅरालिंपीकमध्ये भारताची विक्रमी कामगिरी

पॅरिस येथे झालेल्या पॅरालिंपीकची नुकतीच सांगता झाली. भारतासाठी ही स्पर्धा संस्मरणीय ठरली. भारताने या स्पर्धेत ७ सुवर्ण, ९ रौप्य व १३ कांस्य अशी एकूण २९ पदके जिंकत पदक तालिकेत १८ वे स्थान मिळवले. यापूर्वी कोणत्याही स्पर्धेत भारताने इतकी पदके मिळवली नव्हती म्हणूनच ही स्पर्धा भातासाठी ऐतिहासिक ठरली. मागील २०२१ च्या टोकियो पॅरालिंपिकमध्ये भारताने १९ पदके मिळवली होती. त्याआधीच्या रियो पॅरालिंपिकमध्ये भारताने फक्त चार पदके मिळवली होती. याचाच अर्थ केवळ आठ वर्षात भारताने ४ वरून २९ वर उडी मारली आहे. भारताची ही कामगिरी जितकी आश्चर्यकारक आहे तितकीच ती अभिमानास्पद आहे. आजवर भारताने सर्व पॅरालिंपिक मध्ये मिळून ३१ पदके मिळवली होती त्यात आता २९ पदकांची भर पडली आहे. भारताच्या दिव्यांग खेळाडूंनी घेतलेल्या अपार मेहनतीचे फळ त्यांना या पॅरालिंपिक मध्ये मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अर्थात यावेळी भारतीय खेळाडू चमकदार कामगिरी करतील अशी अपेक्षा होतीच पण त्यांनी अपेक्षेपेक्षाही चांगली कामगिरी करून देश वासियांना आश्चर्याचा धक्का दिला. भारताला यावेळी सहा सुवर्णपदके मिळाली ही खूप मोठी कामगिरी आहे. नेमबाजी, बॅडमिंटन, गोळा फेक, थाळी फेक, तिरंदाजी, लांब उडी, उंच उडी, धावणे, ज्युडो अशा सर्वच क्रीडा प्रकारात भारताला पदके मिळाली. भारताच्या पदकांची संख्या आणखी वाढू शकली असती मात्र काही खेळाडूंची पदके अगदी थोडक्यात हुकली. यावेळेस भारताचे ८४ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते त्यातील २९ खेळाडूंनी पदक मिळवले. भारतीय खेळाडूंची ही कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी केलेल्या या विक्रमी कामगिरीचा देशातील १४० कोटी जनतेला अभिमान आहे. पॅरालिंपीक ही दिव्यांग खेळाडूंची ऑलिंपिक स्पर्धा असते. मुख्य ऑलिंपिक स्पर्धा संपल्यावर तिचे आयोजन केले जाते. मुख्य ऑलिंपिक प्रमाणेच पॅरालिंपीक स्पर्धेला पण प्रतिसाद मिळाला पाहिजे. खेळाडूंचे कौतुक झाले पाहिजे पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही मुख्य ऑलिंपिक स्पर्धेत भारताने केवळ सहा पदके मिळवली. त्यावेळी भारतीयांना आनंदाचे भरते आले. मुख्य ऑलिंपिकमध्ये भारताने एकही सुवर्णपदक मिळवले नाही केवळ रौप्य आणि कांस्यपदकावर भारताला समाधान मानावे लागले. तरीही देशात दिवाळी साजरी झाली. मीडियावर पदक विजेत्या खेळाडूंच्या अभिनंदांची स्पर्धाच लागली पण पॅरालिंपक मध्ये विक्रमी कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या दिव्यांग खेळाडूंच्या पदरी मात्र निराशाच आली. या खेळाडूंचे म्हणावे तसे कौतुक झाले नाही. आजही दिव्यांगांकडे सहानुभूतीनेच पाहिले जाते वास्तविक या पदक विजेत्या दिव्यांग खेळाडूंना सहानुभूतीची नाही तर कौतुकाची, प्रोत्साहानाची गरज आहे. दिव्यांग खेळाडूंकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला तर ते देशासाठी आणखी चांगली कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करतील यात शंका नाही. पॅरालिंपिक मध्ये विक्रमी कामगिरी करणाऱ्या भारतीय खेळाडूंचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आत्महत्या: एक गंभीर सामाजिक मुद्दा!

सर्वांनी एकत्र येऊन एक सकारात्मक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे लोक मानसिक आरोग्याबद्दल उघडपणे बोलू शकतील आणि मदत मागू शकतील. आपण प्रत्येकजण आत्महत्या प्रतिबंधासाठी काहीतरी करू शकतो, समजून घेणे, ऐकणे आणि मदत करण्यास पुढाकार घेणे महत्त्वाचे आहे. विश्व आत्महत्या प्रतिबंध दिन हा संदेश देतो की, जीवनातील कठीण प्रसंगांमध्ये देखील मदत आणि आशा नेहमीच उपलब्ध आहे. असा आशावाद श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी येथे मांडला आहे...

१० सप्टेंबरला दरवर्षी विश्व आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा केला जातो. हा दिवस आत्महत्येच्या समस्येबद्दल जनजागृती करण्यासाठी आणि आत्महत्या रोखण्यासाठी कृती करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. आत्महत्या हा एक गंभीर सामाजिक मुद्दा आहे, ज्यामुळे अनेक लोकांचे जीवन उद्ध्वस्त होते. या दिवशी विविध कार्यक्रम, चर्चासत्रे आणि जागतिक स्तरावर मोहिमा आयोजित केल्या जातात, ज्यामुळे लोकांना मानसिक आरोग्याबाबत जागरूकता मिळते. ताणतणाव, नैराश्य आणि मानसिक समस्यांवर योग्य वेळी उपचार न घेतल्यास आत्महत्येची शक्यता वाढते. त्यामुळे वेळेवर मदत मिळाल्यास आत्महत्येची समस्या मोठ्या प्रमाणात रोखता येऊ शकते.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन म्हणजे काय? तर, जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन दरवर्षी १० सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. आत्महत्येच्या विचारांबद्दल किंवा मानसिक तणावाबद्दल बोलल्याने आत्महत्या टाळता येऊ शकते, हे सांगण्याचे औचित्य म्हणजे जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन!जगभरातील विविध उपक्रमांद्वारे आत्महत्या रोखण्यासाठी यादिवशी संदेश देण्यात येतो. सन २००३ पासून या दिवसाची सुरवात झाली. हा वार्षिक जागरूकता दिवस इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सुसाइड प्रिव्हेन्शन- आईएएसपी द्वारे आयोजित केला जातो. आईएएसपीच्या मते प्रत्येक आत्महत्या विनाशकारी असते आणि त्याचा त्यांच्या आजूबाजूच्या लोकांवर खोलवर परिणाम होतो. परंतु जागरूकता वाढवून, आपल्या सभोवतालच्या लोकांशी बोलून, आपण जगभरातील आत्महत्येच्या घटना कमी करू शकतो. जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन हा आत्महत्येबद्दल जागरुकता निर्माण करण्याची आणि ती रोखण्यासाठी प्रयत्नांना चालना देण्याची संधी आहे.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन- डब्ल्यूएसपीडी हा सन २००३पासून जगभरातील विविध उपक्रमांसह, आत्महत्या रोखण्यासाठी जगभरातील वचनबद्धता आणि कृती प्रदान करण्यासाठी दरवर्षी १० सप्टेंबर रोजी पाळला जाणारा जागरूकता दिवस आहे. आत्महत्या प्रतिबंधक आंतरराष्ट्रीय संघटना- आईएएसपी जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचे आयोजन करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना- डब्ल्यूएचओ आणि मानसिक आरोग्यासाठी जागतिक फेडरेशन-डब्ल्यूएफएमएच सह सहकार्य करते. सन २०११मध्ये अंदाजे ४० देशांनी यानिमित्ताने जागरूकता कार्यक्रम आयोजित केले होते. सन २०१४मध्ये प्रसिद्ध झालेल्या डब्ल्यूएचओच्या मेंटल हेल्थ ॲटलस अनुसार कमी उत्पन्न असलेल्या कोणत्याही देशात राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरण नसल्याची नोंद आहे, तर कमी-मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये १० टक्केपेक्षा कमी आणि उच्च-मध्यम आणि उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये जवळजवळ एक तृतीयांश देशांमध्ये होते. सन २००३मधील पहिल्या कार्यक्रमात सन १९९९च्या डब्ल्यूएचओच्या जागतिक आत्महत्या प्रतिबंधक उपक्रमाचा उल्लेख त्याच्या अंमलबजावणीसाठी मुख्य धोरणाच्या संदर्भात केला आहे, ज्याची आवश्यकता आहे, आत्महत्या वर्तणुकीबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि त्यांना प्रभावीपणे कसे रोखता येईल यासाठी जागतिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय बहु-क्षेत्रीय क्रियाकलापांची संघटना होय. आत्महत्या प्रतिबंधासाठी राष्ट्रीय धोरणे आणि योजना विकसित आणि मूल्यांकन करण्यासाठी देशांच्या क्षमतांचे बळकटीकरण गरजेचे ठरते. अलीकडील डब्ल्यूएचओच्या प्रकाशनानुसार सामाजिक कलंकाद्वारे दर्शविलेली आव्हाने, आत्महत्येवर उघडपणे चर्चा करण्यासाठी निषिद्ध आणि डेटाची कमी उपलब्धता हे अजूनही अडथळे आहेत. ज्यामुळे आत्महत्या आणि आत्महत्या प्रतिबंध या दोन्ही प्रयत्नांसाठी डेटा गुणवत्ता खराब होते. आत्महत्येची संवेदनशीलता आणि काही देशांमध्ये आत्महत्येच्या वर्तनाची बेकायदेशीरता मृत्यूच्या इतर कारणांपेक्षा कमी रिपोर्टिंग आणि चुकीचे वर्गीकरण या आत्महत्येसाठी मोठ्या समस्या आहेत. आत्महत्येमध्ये अनेक गुंतागुंतीचे आणि परस्परसंबंधित आणि अंतर्निहित योगदान करणारे घटक असतात, जे वेदना आणि निराशेच्या भावनांना कारणीभूत ठरू शकतात. स्वतःला मारण्याच्या साधनांमध्ये प्रवेश असणे- सर्वात सामान्यतः बंदुक, औषधे आणि विष हे देखील एक जोखीम घटक आहे.

पुरुष आत्महत्येचे प्रमाण महिला आत्महत्येपेक्षा जास्त आहे. युरोपियन आणि अमेरिकन समाजांमध्ये आत्महत्यांमुळे पुरुषांच्या मृत्यूचे प्रमाण इतर कोणत्याही समाजापेक्षा जास्त आहे, तर विविध आशियाई लोकांमध्ये ते खूपच कमी आहे. बदलत्या लिंग भूमिकांमुळे जागतिक स्तरावर महिलांपेक्षा पुरुषांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये आत्महत्येचा विचार जास्त असला तरी पुरुषांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. सरासरी, प्रत्येक स्त्रीमागे सुमारे तीन पुरुष आत्महत्या आहेत- जरी आशियातील काही भागांमध्ये हे प्रमाण खूपच कमी आहे. आत्महत्येच्या दरातील असमानता- अधिक प्राणघातक माध्यमांचा वापर करून आणि अधिक आक्रमकतेचा आणि मृत्यूच्या उच्च हेतूचा अनुभव, आत्महत्या करताना, स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अंशतः स्पष्ट केले गेले आहे. पुरुष आणि स्त्रियांमध्ये वेगवेगळ्या आत्महत्येच्या दरांची अनेक संभाव्य कारणे आहेत- लैंगिक समानतेच्या समस्या, पुरुष आणि स्त्रियांसाठी तणाव आणि संघर्ष हाताळण्याच्या सामाजिकदृष्ट्या स्वीकार्य पद्धतींमध्ये फरक, आत्महत्येच्या विविध माध्यमांची उपलब्धता आणि प्राधान्य, उपलब्धता आणि दारू पिण्याचे नमुने , तसेच पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील मानसिक विकारांसाठी काळजी घेण्याच्या दरांमधील फरक. आत्महत्येसाठी लिंग गुणोत्तरातील अतिशय विस्तृत श्रेणी सूचित करते की या भिन्न कारणांचे सापेक्ष महत्त्व देश आणि प्रदेशानुसार मोठ्या प्रमाणात बदलते. पाश्चिमात्य देशांमध्ये महिलांच्या तुलनेत पुरुषांच्या आत्महत्येने मृत्यूची शक्यता तिप्पट आहे.

काही आत्महत्या कमी करण्याच्या रणनीती नर आणि मादीच्या स्वतंत्र गरजा ओळखत नाहीत. संशोधकांनी आक्रमक दीर्घकालीन उपचारांची शिफारस केली आहे आणि पुरुषांसाठी पाठपुरावा केला आहे, जे आत्महत्येच्या विचारांचे संकेत दर्शवतात. अभ्यासात असेही आढळून आले आहे की तरुण स्त्रियांना आत्महत्येचा प्रयत्न करण्याचा धोका जास्त असतो, या लोकसंख्येच्या अनुषंगाने तयार केलेली धोरणे एकूण दर कमी करण्यासाठी सर्वात प्रभावी आहेत. लैंगिक भूमिका आणि सामाजिक नियमांबद्दल सांस्कृतिक दृष्टीकोन बदलणे आणि विशेषतः पुरुषत्वाबद्दलच्या कल्पना, लैंगिक अंतर बंद करण्यासाठी देखील योगदान देऊ शकतात- सामाजिक स्थिती आणि कार्य भूमिका पुरुषांच्या ओळखीसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे गृहित धरले जाते. खून आणि युद्धापेक्षा जास्त लोक आत्महत्येमुळे मरतात; हे जगभरातील मृत्यूचे १३ वे प्रमुख कारण आहे. डब्ल्यूएचओच्या मते वीस लोक आहेत ज्यांचे आत्महत्येचा प्रयत्न प्रत्येक प्राणघातक आहे, दर तीन सेकंदाला अंदाजे एक आत्महत्या हे १५ ते २४ वयोगटातील लोकांसाठी मृत्यूचे सर्वात सामान्य कारण आहे. डब्ल्यूएचओच्या मते, जगातील सर्व हिंसक मृत्यूंपैकी जवळपास निम्मे मृत्यू या आत्महत्या ठरतात. ब्रायन मिश्रा आईएएसपीचे अध्यक्ष यांनी नमूद केले की, सर्व युद्धे, दहशतवादी कृत्ये आणि परस्पर हिंसेमध्ये मरण्यापेक्षा जास्त लोक स्वत:ला मारतात. २९ वयोगटातील आत्महत्यांची सर्वाधिक संख्या दर्शवितो, तर ८०+ मधील सर्वात कमी आत्महत्या. आत्महत्येच्या वर्तनाच्या विकासामध्ये सामाजिक नियम महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. १९व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या समाजशास्त्रीय अभ्यासात आत्महत्येवर प्रथमच निरीक्षणे नोंदवली गेली: त्यावेळच्या आकडेवारीसह समाजशास्त्रज्ञांनी औद्योगिकीकरणाच्या परिणामांचा उल्लेख केला आहे. जसे की नवीन शहरीकरण समुदायांमधील संबंध आणि आत्म-विध्वंसक वर्तनाची असुरक्षितता, सामाजिक दबावांचा आत्महत्येवर परिणाम होतो. आज वेगवेगळ्या देशांमधील आत्महत्येच्या वर्तनातील फरक लक्षणीय असू शकतो. जोखीम आणि संरक्षणात्मक दोन्ही घटकांना संबोधित करून आम्ही आत्महत्या आणि घातक नसलेल्या आत्मघाती वर्तनावर संशोधन करणे आवश्यक आहे. समाजात आत्मघातकी वर्तनांबद्दल जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने, जोखीम आणि संरक्षणात्मक दोन्ही घटकांवरील पुरावे समाविष्ट करून आम्ही जागरूकता मोहिमा विकसित करणे आणि अंमलात आणणे आवश्यक आहे. आम्हाला केवळ जोखीम घटक कमी करण्यासाठीच नव्हे तर संरक्षणात्मक घटक मजबूत करण्यासाठी, विशेषतः बालपण आणि पौगंडावस्थेतील आमच्या प्रयत्नांना लक्ष्य करणे आवश्यक आहे. आत्महत्येच्या वर्तनाशी संबंधित पुरावे-आधारित जोखीम आणि संरक्षणात्मक घटक अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आम्हांला आरोग्य सेवा व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आपण प्राथमिक, दुय्यम आणि तृतीयक प्रतिबंध एकत्र करणे आवश्यक आहे. आम्हाला विविध परिस्थितींवर उपचार करण्यासाठी प्रभावी असल्याचे दर्शविलेल्या उपचारांचा वापर आणि त्यांचे पालन वाढवणे आवश्यक आहे आणि आत्म-हानी आणि आत्महत्येचा धोका कमी करण्याच्या उद्देशाने उपचारांच्या परिणामकारकतेसाठी संशोधनास प्राधान्य देणे. आम्हाला मानसिक आरोग्य संसाधनांची उपलब्धता वाढवण्याची आणि काळजी घेण्यातील अडथळे कमी करण्याची गरज आहे. आत्महत्या प्रतिबंधक संशोधनाचे पुरावे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर धोरणकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. आम्हाला कलंक कमी करणे आणि सामान्य लोकांमध्ये आणि आरोग्य सेवा व्यावसायिकांमध्ये मानसिक आरोग्य साक्षरता वाढवणे आवश्यक आहे. आम्हाला अशा लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे जे मदत घेत नाहीत आणि त्यामुळे त्यांना जेव्हा गरज असते तेव्हा उपचार मिळत नाहीत. आत्महत्या संशोधन आणि प्रतिबंध यासाठी आम्हाला शाश्वत निधीची खात्री करणे आवश्यक आहे. सर्व देशांसाठी आत्महत्या प्रतिबंधक रणनीती विकसित करण्यासाठी आणि जीव वाचवण्यासाठी दाखविल्या गेलेल्या त्या धोरणांच्या अंमलबजावणीला पाठिंबा देण्यासाठी आम्हाला सरकारांवर प्रभाव टाकण्याची गरज आहे. वेगवेगळ्या स्त्रोतांकडून आत्महत्येच्या विषयावरील मुख्य कोट्सचा संक्षिप्त सारांश असा आहे- आत्महत्येचे मुख्य कारण म्हणजे गरिबी, बेरोजगारी , एखाद्या प्रिय व्यक्तीचे नुकसान, वाद आणि कायदेशीर किंवा कामाशी संबंधित समस्या, आत्महत्या अनेक जटिल सामाजिक-सांस्कृतिक घटकांमुळे होतात आणि सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक कालावधीत होण्याची शक्यता असते. संकट (उदा. एखाद्या प्रिय व्यक्तीचे नुकसान, बेरोजगारी, लैंगिक अभिमुखता, एखाद्याची ओळख विकसित करण्यात अडचणी, एखाद्याच्या समुदायापासून किंवा इतर सामाजिक/विश्वास गटापासून अलिप्तता, आणि सन्मान श्रीमंत देशांमध्ये, तिप्पट ). स्त्रियांपेक्षा पुरुष आत्महत्येने मरतात, जगातील बहुतेक भागांमध्ये, धार्मिक किंवा सांस्कृतिक कारणांमुळे आत्महत्येला कलंकित केले जाते आणि त्याची निंदा केली जाते. काही देशांमध्ये, आत्महत्येचे वर्तन हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. त्यामुळे आत्महत्या ही बऱ्याचदा निषिद्ध द्वारे वेढलेली एक गुप्त कृती असते आणि ती अपरिचित, चुकीचे वर्गीकरण असू शकते. मृत्यूच्या अधिकृत नोंदींमध्ये जाणीवपूर्वक लपवलेले कलंक , विशेषतः मानसिक विकार आणि आत्महत्येचा म्हणजे स्वतःचा जीव घेण्याचा विचार करणारे किंवा आत्महत्येचा प्रयत्न करणारे लोक मदत घेत नाहीत आणि त्यामुळे त्यांना आवश्यक ती मदत मिळत नाही. एक प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या म्हणून आत्महत्येबद्दल जागरूकता नसल्यामुळे आणि अनेक समाजांमध्ये त्यावर खुलेपणाने चर्चा करण्यासाठी निषिद्ध असल्यामुळे आत्महत्या रोखण्याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. चला उठा, आत्महत्या रोखण्यात प्रगती करुया.

शारीरिक आणि विशेषतः मानसिक आरोग्य अक्षम करणाऱ्या समस्या जसे की नैराश्य, गुंतागुंतीच्या आणि परस्परसंबंधित घटकांच्या लांबलचक यादीपैकी सर्वात सामान्य आहेत, आर्थिक समस्यांपासून ते गैरवर्तन, जसे आक्रमकता, शोषण आणि गैरवर्तन यांच्या अनुभवापर्यंत, जे वेदनांच्या भावनांना कारणीभूत ठरू शकतात. आणि आत्महत्या अंतर्गत निराशा. सहसा पदार्थ आणि अल्कोहोल गैरवर्तन देखील एक भूमिका बजावते. प्रतिबंधक रणनीती सामान्यतः सामाजिक कलंक आणि आत्मघाती वर्तनांबद्दल जनजागृतीवर भर देतात. चला तर मग, जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन यशस्वी करुया !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे, श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ, रामनगर, गडचिरोली. फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# देवेंद्र फडणवीस; वैचारिक अधोगती

देवेंद्र फडणवीस; कोण होतास तू,काय झालास तू ,अरे वेड्या कसा वाया गेलास तू एक हुशार, चतुर, अभ्यासू, सत्ताधाऱ्यांना घाम फोडणारा-विरोधक, विधानसभा दणाणून सोडणाऱ्या वाक्चातुर्याने विरोधकांची कोंडी करणारा असा उच्च शिक्षित सामाजिक, राजकीय प्रश्न कोळून प्यालेला लोकप्रतिनिधी देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला लाभलेले अमूल्य रत्न आहे. हा महाराष्ट्रातच नव्हे तर देशात कौतुकाचा विषय होता,समज होता.मुख्यमंत्री झाल्यावर महाराष्ट्र वेगाने प्रगती करेल, सर्व सामान्यांचे जटील प्रश्न सुटतील असे वाटत होते, मोदी, शाहच्या आशीर्वादाने ते मुख्यमंत्री झाले नाहीत तर त्यांची स्वतःची तेव्हडी कुवत होती म्हणून महाराष्ट्राची सूत्रे त्यांच्या हाती आली. पण, झाले उलटेच ते गुजरातच्या व्यापाराच्या



हातचे बाहुले झाले. आपल्या चाणक्य नीतीला त्यांनी कुटील चाण्यकेचे लेबल लावले. महाराष्ट्रात भाजपला सोन्याचे दिवस पाहायला मिळाले त्याच बाळासाहेबांच्या शिवसेनेला संपवण्याचे कारस्थान बुद्धी गहाण ठेवत मोदी शहांच्या तालावर नाचत शिवसेनेच्या नेत्यांना नामोहरम करण्याचे कारस्थान सुरु केले.दोन पक्ष फोडून लोकशाही खिळखिळी केली.आपल्या खुर्चीला धोका निर्माण होऊ नये म्हणून खडसे,पंकजा मुंडे, विनोद तावडे, ह्या प्रतिस्पर्धीना कुटील चाणक्य नीतीने अडगळीत टाकले. आये हुवे मौके का फायदा उठाना और दुष्मन कि नाकेबंदी करना ह्या विचारानेच कुटील राज्य कारभार केला. हा मराठी माणूस आहे का असा प्रश्न पडतो. पंकजा मुंडे चिकी घोटाळा, प्रकाश मेहता एम पी मिल कंपाउंड एफ एस आय घोटाळा, सुभाष देशमुख तूर घोटाळा, विनोद तावडे अग्निशमन यंत्र खरेदी घोटाळा, गिरीश बापट तूरडाळ घोटाळा, अंगणवाडी मोबाईल खरेदी, सॅनिटरी नॅपकिन घोटाळा, राहुल कुल, भीमा पाटस कारखाना पाचशे कोटीची गडबड ह्या सर्व भ्रष्ट भाजप नेत्यांना क्लीन चिट देऊन हजारो लाखो कोटींचा घोटाळा पचवून महाराष्ट्राचे आर्थिक लचके तोडले.भ्रष्टाचारी महाराष्ट्राला लागलेला कुटील कारस्थानी कलंकित असा माणूस देवेंद्र फडणवीस हा स्वतः ही भ्रष्टाचारी आहे.त्याने सिडको खारघर जमीन घोटाळा,युएलसी जमीन घोटाळा,महा ई पोर्टल घोटाळा,मुंबई डीपी घोटाळा,आणि मेंदूला झिणझिण्या आणणारे संताप येणारे एकही वीट न रचता शिवस्मारक घोटाळा पाहता देवेंद्र फडणवीस हा किती क्रूर उलट्या काळजाचा नेता महाराष्ट्रात जन्माला यावा हे राज्याचे त्याच बरोबर मतदाराचे ही दुर्दैव आहे.मोदी शहांनी देशाचे लचके तोडले तर फडणवीस यांनी महाराष्ट्राचे वाटोळे केले.ईडी सीबीआय एसीबी ह्यांनी ह्या भ्रष्टाचाऱ्यांवर कठोर कारवाई करून महाराष्ट्राची आर्थिक भरपाई करावी.

महाराष्ट्रातील मतदार जनतेला कळकळीची विनन्ती आहे राज्याचे वाटोळे करणारे घरफोडी अहंकारी, दुराचारी, भ्रष्टाचारी, व्यभिचारी, कुटील कारस्थानी अश्या कोणत्याही विकृत विचारांच्या व्यक्तीला कोणत्याही निवडणुकीत निवडून देऊ नये मग तो कोणत्याही पक्षाचा असला तरी किव्वा त्याने कोणतेही आमिष दाखवले तरी त्याला कायमचा समाजातून राजकारणतुन हद्दपार करावे.त्याची सुरुवात नागपूरच्या नागरिक मतदारांनी आपली नैतिकता, महाराष्ट्र स्वाभिमान जपत निश्चयपूर्वक देवेंद्र फडणवीस ह्यांना कायमचे घरी बसवावे.



**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई)**

# आत्महत्या ही भारतातील गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या - डॉ. सुरज सेठिया



## जगभरात दरवर्षी ७ लाखांपेक्षा जास्त आत्महत्या

**जालना । प्रतिनिधी -** जगभरात दरवर्षी ७ लाखांपेक्षा जास्त लोक आत्महत्या करतात. पण, त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक लोक आत्महत्येचा प्रयत्न करतात. आत्महत्येमागे नैराश्य, असहाय्यता आणि जीवन व्यर्थ असल्याची भावना असते. यामागे वैद्यकीय कारणंही असतात. आत्महत्या ही सार्वजनिक आरोग्याची गंभीर चिंता आहे. प्रत्येक आत्महत्येचा सामाजिक, भावनिक आणि आर्थिक क्षेत्रासह समुदायांवर दूरगामी परिणाम होतो. आत्महत्येच्या विचारातून बाहेर येण्यासाठी सुसाइड हेल्पलाईनची मदत, समुपदेशन, सकारात्मक विचार आणि वैद्यकीय मदत हे मार्ग आहेत.आत्महत्या रोखल्या जाऊ शकतात, याविषयी जगभरात जनजागृती करणे हा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती मानसोपचार तज्ञ तथा धैर्य व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. सुरज राजेश सेठीया यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना डॉ. सुरज सेठीया म्हणाले की, जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन १० सप्टेंबर रोजी जागतिक स्तरावर साजरा केला जातो. आत्महत्या प्रतिबंधाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि आत्महत्येचा प्रयत्न, विचार करणाऱ्यांना अथवा प्रयत्नामुळे झालेल्या नुकसानीचा सामना करण्यासह या चक्रातून बाहेर काढण्यासाठी हा दिन साजरा केला जातो. चेंजिंग द नॅरेटिव्ह ऑन सुसाइड म्हणजेच आत्महत्येचे वर्णन बदलणे हे या दिनाची त्रेवार्षिक थीम आहे. आत्महत्येचा परिणाम आणि आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रबोधन आणि काय प्रयत्न करता येतील, याचा विचार या माध्यमातून केला जातो. तांत्रिक भाषेत जाणूनबुजून स्वतःचा जीव घेणे याला आत्महत्या असे म्हणतात. ही एक गुंतागुंतीची समस्या आहे जी जगभरातील अनेकांना भेडसावत आहे आणि तिच्यावर अनेक बदलांचा प्रभाव पडतो, जसे की क्लेशकारक वैयक्तिक अनुभव, सामाजिक- आर्थिक परिस्थिती आणि मानसिक आरोग्याशी संघर्ष. आत्म हत्या ही सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या आहे. आत्महत्या रोखण्यासाठी, आत्महत्या या विषयाचा कलंक कमी करण्यासाठी जागरूकता वाढविण्यासाठी आत्महत्या या मुद्द्यावर स्पष्ट चर्चा व्हावी, या गुंतागुंतीच्या समस्येबद्दलची आपली समज बदलणे, कलंकित आणि बंद संस्कृतीपासून मुक्त, दयाळू आणि सहाय्यक असलेल्या संस्कृतीकडे जाणे हा उद्देश समोर ठेवून जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा केला जातो, अशी माहिती डॉ. सुरज सेठीया यांनी दिली.

आत्महत्या रोखण्याबाबतच्या चर्चेला कॉल टू क्शनद्वारे सुरुवात करावी. या विषयावरील चर्चा उपयुक्त असा समाज निर्माण करण्यास मदत करते. ही महत्त्वाची संभाषणे सुरू करून, आपण सर्वांनी आत्महत्येचा विचार करणाऱ्याला अथवा आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याला धीर देऊन जागरूकता वाढवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची थीम ही धोरणे तयार करताना मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंधास सर्वोच्च प्राधान्य देते, असे सांगून डॉ. सेठीया म्हणाले की, आत्महत्या रोखणे ही सार्वजनिक आरोग्याची प्राथमिकता आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या अंदाजानुसार दरवर्षी ७ लाखाहून अधिक लोक आत्महत्या करतात किंवा दर ४० सेकंदाला एक आत्महत्या होते. क्षेत्र, वयोगट आणि लिंगानुसार आत्महत्या दर भिन्न असतात; पुरुषांमध्ये स्त्रियांपेक्षा जास्त दर आढळतात. आत्महत्येपूर्वी अनेकदा चिंता, नैराश्य किंवा दीर्घ व दुर्धर आजार यासह मानसिक आरोग्याच्या समस्येमुळे आत्महत्या वाढल्या आहेत, अनेकांना आत्महत्येचे विचार येतात. विशेषत: तरुण लोकसंख्येच्या वाढत्या आत्महत्येच्या दराने भारत ग्रासलेला आहे. या चिंताजनक प्रवृत्तीचा सामना करण्यासाठी, देशभरातील विविध स्वयंसेवी संस्था या समस्येचे निराकरण करण्यासाठी बहुआयामी पद्धतींचा अवलंब करीत आहेत. आत्महत्या प्रतिबंधाच्या जनजागृतीसाठी शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागात कार्यशाळा, परिसंवाद आणि जागरूकता मोहिमेचे आयोजन करण्याची गरज असल्याचे डॉ. सुरज सेठीया म्हणाले.

# मौजे लोंढेवाडी विविध विकास कामांचे भास्कर दानवे यांच्या हस्ते उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** लोंढेवाडी गावातील पाण्याची समस्या दूर करण्यासाठी गावातील सरपंच निवृत्त लंके यांनी पाठपुरावा करून गावासाठी जलजीवन योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी २५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता त्याच प्रमाणे ९५०५ योजने अंतर्गत खंडोबा मंदिर समोर तसेच शिवाजी महाराज चौक ते मारोती मंदिर या ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी २० लक्ष रुपयांचा निधी गावासाठी मा. रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नातून उपलब्ध करुन देण्यात आला होता यावेळी या सर्व पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

तसेच गावकऱ्यांच्या मागणी नुसार गावातील स्मशानभूमी जवळ नालीसह सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रुपये, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सि.सि. स्मशानभूमी रोड चे बांधकाम करण्यासाठी ७ लक्ष रूपये व २५१५ योजनेअंतर्गत सामाजिक सभागृह बांधण्यासाठी १० लक्ष रूपये निधी उपलब्ध करून दिला आहे, यावेळी या कामांचे भूमिपूजन देखील करण्यात आले.

तसेच शिवशंभू गणेश मंडळ, लोंढेवाडी यांच्या वतीने गावामध्ये एक गाव - एक गणपती या संकल्पनेतून सार्वजनिक गणेशउत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे यावेळी भास्कर दानवे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. तसेच गावकऱ्यांच्या वतीने झालेल्या विकासकामांबद्दल भास्कर दानवे यांचे आभार मानले व गावातील काही विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार गावामध्ये एक सुसज्य असे वाचनालय लवकरच बांधून देऊ असे आश्वासन श्री दानवे यांनी यावेळी दिले.



याप्रसंगी युवा मोर्चाचे जिल्हाअध्यक्ष भागवत बावणे, तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, ज्ञानेश्वर उगले, काकासाहेब घुले, मुकेश चव्हाण, विठ्ठलराव सातपुते, किसनराव उगले, संतोष मैद, अंबादास लोंढे, संदीप बोरुडे, गांभीरराव पडोळ, दत्ता महाराज उंबरे, गजू उंबरे, प्रकाश महाराज उंबरे, सरवाराम उंबरे, बबनराव जाधव, पवार वाल्मीक, ज्ञानेश्वर लंके, शेषराव मगर, सखाराम पवार, सावता कदम, श्रीराम वाघमारे, विजय वाघमारे, शेषराव पटरे, शिवाजी लोंढे यांच्यासह आयोजक सरपंच निवृत्ती लंके, कैलास कदम, दत्ता मैद व अनेक भाजप कार्यकर्ते, गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**आनंदाचा शिधा वाटपाचा शुभारंभ सोमवार (दि ९) जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर यांच्या हस्ते करण्यात आला. या शिधामध्ये साखर, सोयाबीन तेल, चनादाल, रवा एक-एक किलो असून प्रति कुटुंब १०० रुपये या प्रमाणे देण्यात येत आहे. येत्या ३० सप्टेंबर पर्यंत या शिधाचे वितरण जालना जिल्हातील स्वस्त धान्य दुकानातून करण्यात येणार आहे. नूतन वसाहत येथेही स्वस्त धान्य दुकानातून या योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. यावेळी महेंद्रकर, प्रकाश जाधव, मनीत कक्कड, प्रभाकर डोंगरे, श्यामसुंदर इंदानी, शाम वाघमारे, राम शहाणे, सुनील चोधरी, अनिल घाडगे, शैलेश कक्कड यांच्यासह स्वस्त धान्य दुकानदारांची उपस्थिती होती. (छाया- किरण खानापुरे)**



# उसर खुर्द येथे वर्षावास प्रवचन मालिकेचे दहावे पुष्प संपन्न



**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा आणि बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा व उपशाखा तळा जि. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०८ सप्टेंबर २०२४ रोजी मुक्काम उसर खुर्द तालुका तळा या ठिकाणी आयु.महेंद्रजी पवार यांच्या अध्यक्षते खाली वर्षावास प्रवचन मालिकेचे १० वे पुष्प गुंफण्यात आले. तथागत बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन करून वर्षावास प्रवचन मालिकेस सुरुवात झाली. त्रिसरण-पंचशीलाचे पठण बौद्धाचार्य आयु.अनेशजी येलवे यांनी केले. वर्षावास प्रवचन मालिके निमित्ताने बौद्धजन विकास मंडळ मुक्काम उसरखुर्द येथे सभासद आयु. संदेशजी पवार यांच्या आजी कालकथित बाबीबई महादेव पवार यांचा द्वितीय स्मृतिदिन देखिल साजरा केला गेला. कार्यक्रम प्रसंगी उपस्थित जिल्हा, तालुका मान्यवर पदाधिकारी यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा अध्यक्ष आयु. रामदासजी शिंदे गुरूजी यांनी प्रस्ताविक केले.

भारतीय बौद्धमहासभा राष्ट्रीय संरक्षक आदरणीय महाउपसिका मिरातांईजी आंबेडकर यांनी आपल्याला सांगितले आहे की,आपल्यातले हेवेदावे, मतभेद विसरून एकत्र येण्याचा आदेश दिला आहे त्या आदेशाचे पुनः प्रतिपादन आयु.रामदासजी शिंदे यांनी त्यांच्या प्रास्ताविकेत केले. बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा अध्यक्ष आयु. आनंदजी मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

त्याच प्रमाणे आजचा विषय बौद्धांची आचारसंहिता या विषयावर भारतीय बौध्दमहासभा महाराष्ट्र राज्य माजी पर्यटन सचिव केंद्रीय शिक्षक प्रवचनकार आयु.संजयजी सोनवणे गुरूजी यांनी आपल्या शैलीतून धम्मप्रवचन दिले. सदरच्या प्रवचन मालिकेस मोठ्यासंख्येने धम्म उपासक-उपसिका व श्रोतेमंडळी धम्म श्रवण करण्यासाठी उपस्थित होते.

आजच्या प्रवचनमालिकेस भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा तळा व त्यांचे पदाधिकारी, महिला तालुका शाखा तळा तसेच, बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा व उपशाखा तळा चे आजी माजी पदाधिकारी तसेच धम्म उपासक-उपसिका उपस्थित होते. या कार्यक्रमास बौद्धजन विकास मंडळ उसरखुर्द व मुंबई मंडळ यांची उपस्थिती लाभली होती.

प्रवचन मालिकेचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ०४ चरई दहिवली विभाग सहा गांव ग्रुप अध्यक्ष आयु. संदेश रामदास पवार यांनी केले, व त्यानंतर उपस्थितांना भोजदान देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पान १ वरुन

### तर याच ...

त्यावर उद्या दि. १० सप्टेंबर मंगळवार रोजी केंद्रीयमंत्री जे.पी. नड्डा यांच्या दालनात सुनावणी होणार असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अपेक्षित असणारी जागा अधिष्ठाता यांच्या नावावर झाली असून जालना येथील सिव्हील हॉस्पिटलला मेडिकल कॉलेज संलग्न करण्यात आले आहे. शिवाय ग्लोबल गुरुकुलची जागा मेडिकल कॉलेजसाठी भाडे तत्वावर घेण्यात आली आहे. त्यामुळे आता केवळ प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक पद भरतीचा प्रश्न उरला असून राज्य शासनाच्या सचिवांनी पद भरती संदर्भातील हमीपत्र देखील केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयास सादर केले असून उद्या मंगळवारी त्यावर सुनावणी होणार असल्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक या पदांची भरती तातडीने करण्यात यावी यासाठी आपण राज्य सरकारकडे पाठपुरावा करत असून त्यासाठी सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ही पदभरती झाल्यास याच शैक्षणिक वर्षापासून जालन्यातील मेडिकल कॉलेज सुरू होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

### जोडरस्त्यासाठी ...

दिनांक ०९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजेपासून १:०० पर्यंत दिड तास रास्ता रोको जगसेन (रास्ता जोडो) आंदोलन करण्यात आले.दरम्यान म रा रस्ते विकास महामंडळाकडून एका महिन्याच्या मुदतीत वरिल काम पुर्ण करुन देण्याचे आश्वासन आष्टी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड यांना फोनद्वारे दिले. हे काम कार्यकारी अभियंता यांच्याकडून करुन देण्याच्या जबाबदारी आष्टी ठाण्याचे सपोनी सचिन इंगेवाड यांनी शेतकरी आंदोलकांना दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन एका महिन्यासाठी स्थगित करण्यात आले. यावेळी सुग्रीव मुंडे, प्रवीण चौरे, रमेश (बंडू) नांगरे,हनुमान वाघमारे, कल्याण कारभारी, रामा डुरे बबन चौरे प्रवीण चौरे माऊली चौरे अशोक घुले मारुती चौरे सचिन तिडके सिद्धेश्वर राग माऊली चौरे पिंटू घुले उत्तम चौरे राजेभाऊ आघाव नंदू गांजेअंगद मुंडे संदीप नांगरे दत्ता तिडके दत्ता चौरे परमेश्वर चौरे कृष्णा चौरे आबा चौरे भारत तिडके कानिफ नांगरे बाळू मोरे सोपान वाघमारे सुरेश केदार लक्ष्मण चौरे दत्ता वाघ अर्जुन घुले बालासाहेब चौरे सखाराम चौरे महिपती चौरे बाबुराव चौरे विशाल मुंडे भीमा गायकवाड कृष्णा गायकवाड विशाल चौरे सचिन राख आकाश धुळे बाबासाहेब चौरे नवनाथ नांगरे सतीश नांगरे पोपट चौरे भाऊसाहेब व्यवहारे जिजा शिंदे कृष्णा मोठे यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

### नुकसान भरपाईच्या ...

भरपाई प्रतिझाड एक हजार रुपये याप्रमाणे द्यावी याचबरोबर मोसंबी व द्राक्ष प्रक्रिया उद्योग घनसावंगी व जालना तालुक्यात सुरू करावा, वर्ष २०२४ चा फळ पीक विमा मंजूर करावा यासह विविध मागण्यांसाठी जालन्यात आज फळ बागायतदार शेतकऱ्यांनी महारॅली काढलीय. शासनाने आमच्या मागण्यांची दाखल घेऊन मागण्या तातडीने मान्य कराव्यात नसता फळ बागायतदार शेतकरी मोठे आंदोलन उभ करतील असा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिलाय. या महारॅली फळ बागायतदार शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी जोरदार घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला होता.

यावेळी गजानन रामनाथ उगले,गजानन देवडकर,कारभारी मिठे,किशोर मरड,ज्ञानेश्वार ऊढान,ऊध्दव चव्हाण,ईरफान खान,बाबा ऊगले ई. सह जिल्हाभरातील शेतकऱ्यांची मोठ्या संख्ने ऊपस्थिती होती.

### गोदावरी नदी ...

परिसरातील सर्व लोकांनी सतर्क राहावे तसेच चल- मालमत्ता, चिजवस्तू, वाहने, जनावरे, पाळीवप्राणी व शेतीची अवजारे इत्यादी साधन सामग्री सुरक्षित स्थळी पाठवावेत. पुरापासून सावध राहावे, आणि धरणाच्या खालील नदी काठावरील नागरी भागामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पूर विसर्गाबाबत व सदरील इशा-याचे गांर्भीय लक्षात घेता नागरिकांच्या जिवित व मालमत्तेची हानी टाळण्यासाठी योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ कराव्यात. अशा सुचना उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी यांना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या आहेत.

**खडकपूर्णा प्रकल्पातुनही पाण्याचा विसर्ग**

खडकपूर्णा प्रकल्पाची एकुण २ वक्रद्वारे ३० से.मी.ने उघडली असून नदीपात्रात ३५९९.७८ क्युसेक एवढा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. तरी धरणाखालील नदीकाठच्या परिसरातील सर्व लोकांनी सतर्क राहावे तसेच चल- मालमत्ता, चिजवस्तू, वाहने, जनावरे, पाळीवप्राणी व शेतीची अवजारे इत्यादी साधन सामग्री सुरक्षित स्थळी पाठवावेत. पुरापासून सावध राहावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

### शासकीय योजनांची ...

आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

माहितीदूत योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांना दि.१३ सप्टेंबर २०२४ पर्यंत www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

### जिल्हा परिषद ...

प्राथमिक व माध्यमिक जि.प.शाळामध्ये मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनलेला दिसुन येतो. अनेक शाळामध्ये रक्षकच मुलींचे भक्षक बनत असल्याचे प्रकरणे व त्यामुळे पालकांच्या मनामध्ये मुलींच्या संरक्षणाविषयी वाढत जाणारी काळजी यामुळे शाळेतील मुलींची गळती वाढू शकते. या सर्व बाबींचा विचार करून भोकरदन तालुक्यातील सर्व जि.प.शाळामध्ये सिसीटीव्ही कॅमेरे बसुन ग्रामीण भागातील मुलींच्या संरक्षणाची जबाबदारी शासनाने तात्काळ उचलावी आणि शाळेतील मुलींची गळती रोखण्यासाठी विधायक स्वरुपाचे प्रयत्न करावे. अन्यथा मुला-मुलींचे सुरक्षीततेसाठी व भविष्य अबाधीत ठेवण्यासाठी शिवसेना रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा देत या बाबत तात्काळ १५ दिवसाच्या आत कार्यवाही करण्यात यावी अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी दिला. यावेळी राजु विर, संजय जाधव यांची उपस्थिती होती.

## लॉयन्सतर्फे महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार

### महिलेला पिको-फॉल मशीन प्रदान करून दिला स्वयंरोजगार



**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब जालनातर्फे महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत सुकन्या कुंडलकर यांना सोमवार दि. ९ सप्टेंबर रोजी साडीला पीको आणि फॉल करण्याची मशीन प्रदान करण्यात येऊन स्वयंरोजगाराचा मार्ग सुकर करून देण्यात आला. हा उपक्रम माजी प्रांतपाल आणि लायन्स परिवाराचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम जयपुरीया यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राबविण्यात आला.

सुकन्या कुंडलकर या सुशिक्षित महिलेने रोजगाराच्यादृष्टीने साडीला पिको-फॉल करण्याचे प्रशिक्षण घेतलेले आहे. मात्र, मशीन नसल्यामुळे तिचा रोजगाराचा मार्ग अडखळला होता. ही बाब विचारात घेऊन, साडी पिको, फॉल करण्याची मशीन प्रदान करण्यात आली. या मशीनमुळे तिचे आत्मनिर्भरतेकडे एक पाऊल पुढे पडले आहे.

मशीन प्रदान सोहळ्याप्रसंगी लॉयन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली यांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल पुरुषोत्तम जयपुरीया यांचे स्वागत केले. याप्रसंगी बळीराम बेन्द्रे, वंदना मुदंडा, अरुण मित्तल, द्वारकादास मुदंडा, राजेश खीस्ते, प्रकाश कुंडलकर, जयप्रकाश श्रीमाली, अतुल लड्ढा, तसेच लायन्स क्लब जालना रॉयल्सच्या पद्मा लड्ढा उपस्थित होत्या. या उपक्रमाच्या माध्यमातून लायन्स क्लबने महिलांना आर्थिकदृष्ट्या सशक्त करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# शंभर कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी - आ. कैलास गोरंटयाल

## वीज बिलावरील खर्चात होणार कोट्यावधींची बचत

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील घानेवाडी येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा जलाशय परिसरात तब्बल १०० कोटी रुपये खर्चाच्या सौरऊर्जा प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली असल्याची माहिती आ. कैलास गोरंटयाल यांनी दिली.

जालना शहरातील जायकवाडी - जालना ही महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे जालना शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वीज बिलांवर वर्षाकाठी जवळपास कोटयावधी रुपयांचा खर्च महानगर पालिकेला करावा लागत असून या होणाऱ्या खर्चात बचत व्हावी यासाठी घानेवाडी येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा जलाशय परिसरात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्या बाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला होता. सदर प्रस्तावास मंजुरी मिळावी यासाठी आपण शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी दिली असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. राज्य शासनाने मंजूर केलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे दोन मेगावॅट वीज निर्मिती होणार असून यामुळे जायकवाडी - जालना या पाणीपुरवठा योजनेद्वारे करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा वीज बिलावर होणारा खर्च कमी होऊन महापालिकेला मोठी मदत होईल आणि बचत होणारा हा पैसा शहरातील विविध विकास कामांवर खर्च करता येईल असेही आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

# आज महालक्ष्मीचे आगमन

**भोकरदन । प्रतिनिधी -** भाद्रपद महिन्यात गणपती बाप्पा आल्यानंतर पाठोपाठ तीन दिवस माहेरी येणाऱ्या गौरीची लगबगही असते.

या वेळी ज्येष्ठा गौरी म्हणजेच महालक्ष्मी मंगळवार( दि. १०) सप्टेंबर रोजी आगमन आहे. पंचांगानुसार भाद्रपद शुक्ल पक्षाची सप्तमी तिथी ९ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजून ५३ मिनिटांनी सुरू होत असून, १० सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजून ११ मिनिटांनी समाप्त होत आहे. उदया तिथीनुसार १० सप्टेंबर मंगळवार रोजी ज्येष्ठा गौराईचे आगमन होणार आहे.

गौरी आवाहनच्या दुसऱ्या दिवशी गौरी पूजन केले जाते. आणि तिसऱ्या दिवशी गौरी विसर्जन केले जाते. अनुक्रमे ११ सप्टेंबरला गौरी पूजन केले जाईल तर १२ सप्टेंबर रोजी गौरी विसर्जन केले जाईल. गौरी पूजनाच्या दिवशी पाहुण्यांना जेवणाला आमंत्रित केले जाते. गौरी पूजन आणि आरती करतात तसेच जेवायला पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी करतात.

तीसऱ्या दिवशी गौरी विसर्जनाच्या दिवशी गौरींची महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. नैवेद्य दाखवतात. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो आणि त्यांचे विसर्जन केले जाते.

कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.